क्र.१६-आरके/प्रिंटर दुरुस्ती-टोनर करार/२१-२२/२०२१.
पोलीस अधीक्षक कार्यालय,कोल्हापूर.
दिनांक -१० /०६/२०२१.

## दरपत्रके सूचना

पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत विविध पोलीस ठाणे/शाखा उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथे कार्यरत असलेल्या प्रिंटरच्या दुरुस्तीसाठी प्रिंटरचे स्पेअर पार्टस् पुरविणेसाठी तसेच प्रिंटरचे टोनर रिफीलींग करुन देण्यासाठी सन २०२१-२२ या कालावधीकरिता वार्षिक सेवा संविदा करार करणेकामी नोंदणीकृत फर्मधारक व कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रके फॉर्म पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथील अभिलेख शाखा येथे दिनांक ११/०६/२०२१ ते दि.२१/०६/२०२१ (शनिवार व रविवार हे सार्वजनिक सुटट्ीचे वगळून) या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी १७.०० या वेळेत उपलब्ध होतील. सदर दरपत्रक फॉर्ममध्ये फर्मधारकांनी प्रिंटरच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणा-या प्रिंटरचे सर्व पार्ट्स्चे दर तसेच प्रिंटरचे टोनर रिफीलींगचे दर नमूद करणे आवश्यक आहे. जे अधिकृत फर्मधारक/कंपनी सदर कामाकरिता दरपत्रके भरु इच्छितात त्यांनी दरपत्रके फॉर्म भरुन ते सिलबंद करुन पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे जमा करण्याची अंतिम तारीख दिनांक २३/०६/२०२० रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत आहे. सदर वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत. संबंधित फर्मधारक/कंपनी यांनी दिलेली दरपत्रके पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे उघडली जातील. प्राप्त झालेली दरपत्रके ही दिलेल्या अटी व शर्तीनुसार स्वीकारणे अगर नाकारणे याबाबत पोलीस अधीक्षक हे अंतिम निर्णय घेतील व तो सर्वांना बंधनकारक राहील.

पो.अ.यांचे
आदेशाने.

10/06/21
(सुनिता नाशिककर)
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक कोल्हापूरकरिता.